Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

**(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)**
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 1, March 2023; Pages 06 –09
DOI: 10.5281/zenodo.8210897

**Original Research Article**

# पंडिता रमाबाई यांची पुरोगामी विचारसरणी व कार्य - एक ऐतिहासिक अध्ययन

अनंत नामदेवराव शिंदे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय उदगीर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* anantshinde1980@gmail.com

Received: 14 February, 2023 | Accepted: 13 March, 2023 | Published: 15 March, 2023

**प्रस्तावना**

भारतीय इतिहासात, 19 वे शतक, विशेषत: 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात, भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचा काळ मानला जातो. यावेळी अनेक ऋषीमुनींनी समकालीन भारतात प्रचलित असलेल्या धार्मिक आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध आवाज उठवला. या काळात, पंडिता रमाबाईंचे नाव सामाजिक दुष्प्रवृत्तींविरुद्ध प्रखर प्रतिकार करणाऱ्या विचारवंतांमध्ये उल्लेखनीय आहे, ज्यांना भारताच्या पहिल्या स्त्रीवादी या उपाधीने संबोधले जाते. महाराष्ट्राच्या इतिहासात पुरोगामी विचार व्यक्त करणाऱ्या तसेच त्या दृष्टिने कार्य करणाऱ्या विचारवंतामध्ये पंडिता रमबाई यांचे कार्य उलेखनीय ठरते. यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील दुर्बल, मागासलेल्या घटकास जीवन जगण्यासाठी आधार उपलब्ध झाला. अशा घटकांना जीवनात विकासाची एक नवी दृष्टि लाभली. समाज सुधारणे पुरोगामी सुधारक म्हणुन पंडिता रमाबाई याना ओळखले जाते. मध्ये अनेक विचारवंतानी योगदान दिले आहे. त्यातील पंडिता रमाबाई यांच्या कार्याचा उल्लेख अग्रक्रमांने केला जातो. मानवता, प्रेम तसेच सेवा भावी वृत्तीच्या पंडिता रमाबाई यांनी समाजसुधारणेच्या दृष्टिने मोठे योगदान दिले. त्यांनी आपल्या पुरोगामी विचाराच्या माध्यमातुन महाराष्ट्रात समाजपरिवर्तनास एक नवी दिशा दिली. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान उलेखनीय ठरले. तात्कालीन परिस्थितीत स्त्री शिक्षणाच्या दृष्टिने प्रयत्न करणे हे धाडसाचे कार्य होते. हे धाडस त्यांनी केले. त्यातुनच त्यांच्या पुरोगामीत्वाची ओळख समाजासमोर निर्माण झाली. या कारणास्तव त्यांचा विचार व कार्याचा अढावा प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे घेण्यात आलेला आहे.

**Keywords**: पंडिता रमाबाई; अनंतशास्त्री डोंगरे; कैसर्य-ए-हिंद; The High Cast Hindu Women; American Ramabai Association

**शोध निबंधाचे उद्देश**

१. पंडिता रमाबाई यांचे जीवन कार्य अभ्यासणे.

२. पंडिता रमाबाई यांच्या पुरोगामी विचारसरणीचा अभ्यास करणे.

३. पंडिता रमाबाई यांचे समाज सुधारणेतील योगदान अभ्यासणे.

**पंडिता रमाबाई यांचे जीवन कार्य**

पंडिता रमाबाई यांच जन्म २३ एप्रिल १८५८ मध्ये गंगामुळ कर्नाटक येथे झाला. त्यांचे वडील अनंत शास्त्री डोंगरे हे कर्नाटकातील मंगळुर येथिल रहिवाशी होते. परंतू पुण्याच्या रामचंद्रपंत साठे यांच्याकडे शिक्षणासाठी आले होते. याच कालावधीत पंडिता रमाबाई यांचा जन्म झाला. पंडिता रमाबाईचे बालपणीचे नाव रामा डोंगरे होते. संस्कृत आणि वेदांचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांच्या नावापुढे पंडिता लावले गेले. यासह, त्यांनी नंतर सात भाषांमध्ये (कन्नड, मराठी, बंगाली, इंग्रजी आणि हिब्रू इ.) प्राविण्य संपादन केले. त्यांच्या ज्ञानाने प्रभावित होऊन केशवचंद्र सेन यांनी त्यांना पंडिता ही पदवी दिली होती. पंडिता रमाबाई यांनी शिक्षणानंतर पुणे या ठिकाणी आपल्या समाजकार्यास सुरूवात केली. त्यांची पुण्यात अनेक व्याख्याने झाली. पुणेकरांवर त्यांनी आपल्या विद्वतेवर चांगली छाप टाकली. त्यातुनच पुढे समाजकार्यासाठी आपले जीवन व्यतित केले.

**सामाजिक कार्य**

पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य विशेष उलेखनीय स्वरूपाचे आहे. पुण्यात वास्तव्यास असताना न्यायमुर्ती रानडे, भंडारकर, मोडक या समाजसुधारकांशी संपर्क आला. त्यांच्या सहकार्याने रमाबाईनी आर्य महिला नावाची संस्था निर्माण केली. या संस्थेच्या माध्यद्वारे महिला उध्दाराचे कार्य सुरू केले. त्यानंतर १८८९ मध्ये शारदा सदनची स्थापणा केली. या संस्थेद्वारे बालविधवा व अनाथ मुलींसाठी कार्य आरंभिले. या कार्यासाठी अमेरीकन मिशनऱ्यांनी त्यांना मदत केली. पुढे याच संस्थेची शाखा पुण्यात उभारण्यात आली. शारदा सदन मध्ये स्त्रीयांची राहण्याची, जेवण्याची मोफत व्यवस्था केली जात असे. स्त्रीशिक्षणाची व्यवस्था देखील यात करण्यात आली होती. त्यांच्या या कार्यास समाजातील दुष्पृवृत्तीने विरोध केला. परंतू त्यांनी आपले कार्य चालु ठेवले. 1882 मध्ये, ब्रिटीश सरकारने भारतात आधुनिक शिक्षणासाठी एक आयोग स्थापन केला, ज्यामध्ये पंडिता रमाबाईंनी सक्रिय भूमिका बजावली आणि एक अहवाल सादर केला ज्यामध्ये त्यांनी महिला शिक्षक, महिला डॉक्टर आणि महिला अभियंता यांच्या गरजेवर जोर दिला. त्यांनी दिलेल्या सूचना राणी व्हिक्टोरियापर्यंत पोहोचल्या आणि त्यांच्या सूचना केवळ लॉर्ड डफरिनच्या कार्यकाळातच स्वीकारल्या गेल्या नाहीत, तर पुढे पंडिता रमाबाईंना ब्रिटिश सरकारने सामाजिक कार्यासाठी ' कैसर-ए-हिंद ' ही पदवीही दिली. पंडिता रमाबाईंच्या प्रयत्नांचे फळ म्हणजे 1886 मध्ये आनंदीबेन जोशी यांनी भारतातील पहिल्या महिला डॉक्टर होण्याचा पराक्रम केला. 1883 मध्ये पंडिता रमाबाई इंग्लंडला गेल्या आणि त्यांनी तिथे ख्रिश्चन धर्माचा अभ्यास केला. काही काळानंतर त्याने ख्रिश्चन धर्म स्वीकारला आणि आपल्या मुलीचा चर्च ऑफ इंग्लंडमध्ये बाप्तिस्मा घेतला आणि स्वतःला शैक्षणिक कार्याशी जोडले. तिच्या या कृतीवर जवळच्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर टीका केली पण दुसरीकडे ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले दाम्पत्यासारख्या लोकांनी रमाबाईंना पाठिंबा दिला.

**धर्मविषयक कार्य**

पंडिता रमाबाईंनी ब्रिटनमधील त्यांच्या वास्तव्यादरम्यान 'द हाय कास्ट हिंदू वूमन' हे पुस्तक लिहिले ज्यामध्ये त्यांनी हिंदू स्त्री असण्याच्या दुष्परिणामांवर विस्तृतपणे चर्चा केली. बालविवाह, सती प्रथा, जातिव्यवस्था, शिक्षण नाकारणे आदी मुद्द्यांचा या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे. पंडिता रमाबाई यांनी सामाजिक कार्याबरोबरच धार्मिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. या उदारमतवादी विचारांच्या होत्या. त्यांनी स्वताः अंतरजातीय विवाह करून समाजापुढे आदर्श प्रस्थापीत केला. त्यांना धार्मिक क्षेत्रातील वाईट चालिरीती, रूढी परंपरा मान्य नव्हत्या. यातुनच पुढे त्यांनी बायबल ग्रंथाचे वाचन केले. बायबल मधील धार्मिक तत्वांकडे त्या आकर्षीत झाल्या त्यातुनच त्यानी ख्रिचन धर्म स्विकारला परंतू महाराष्ट्रातील हिंदु धर्मातील विधवा स्त्रीयांचे दुख: दुर करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. या साठी मुक्ती सदन, आर्य महिला आश्रम इ. संस्थांची स्थापणा करून गरजु महिलांना आधार देण्याचे कार्य केले. त्यांनी धार्मिकतेच्या आधारे कोणताही भेदभाव न करता समाजातील दुर्बल घटक, मागासलेल्या घटकाच्या प्रगतीच्या उद्देशाने कार्य केले. शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी व्याख्यान दिले, तेव्हा तेथे रमाबाईंच्या नेतृत्वाखाली अनेक महिलांनी त्यांचा निषेध केला आणि प्रश्न उपस्थित केला की जर हिंदू धर्म इतका महान आहे तर तेथील स्त्रियांची अवस्था इतकी दयनीय का आहे. ? यासोबतच स्वामी विवेकानंदांच्या भाषणात पंडिता रमाबाईंनी महिलांकडे दुर्लक्ष केले होते. स्वामी विवेकानंदांच्या व्याख्यानावर भाष्य करताना पंडिता रमाबाई म्हणाल्या की, " त्यांनी हिंदू धर्माच्या बाह्य सौंदर्याकडे बौद्धिक चर्चेने आणि बाह्य सौंदर्याकडे पाहू नये, तर त्या भव्य धर्माच्या खाली असलेल्या काळ्या खोल कोठडीकडेही पहावे जेथे स्त्रिया आणि कनिष्ठ जातींवर अत्याचार केले जातात." पूर्ण, हे उल्लेखनीय आहे की स्वामी विवेकानंद आणि पंडिता रमाबाई यांच्यात मोठ्या प्रमाणात मतभेद होते आणि दोघेही एकमेकांना नापसंत करत होते. तथापि, दोघेही त्या क्षणाच्या मुद्द्यांबद्दल त्यांचे मत अगदी स्पष्ट होते, जिथे स्वामी विवेकानंद धर्माचे तर्कशुद्ध व्याख्या देत होते आणि पंडिता रमाबाई स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करत होत्या.

**दुष्काळ ग्रस्तासाठीचे कार्य**

महाराष्ट्रात शेतकरी वर्गासमोर फार मोठ्या समस्या होत्या. त्या आजही आहेत यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे सततचा दुष्काळ होय. पुर्वीपासुनच महाराष्ट्रात अनेकदा दुष्काळ पडला आहे. इ. स. १८९७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. शेतकरी तसेच मजुरवर्ग आणि गरीबांचे दुष्काळामुळे मोठे हाल झाले. अनेकांना उपासमारीमुळे आपला जीव गमवावा लागला. अशा दुष्काळी परिस्थितीत रमाबाईनी गोर गरिब जनतेला उपासमारीपासुन वाचवण्याचे काम केले. शेतकरी व मजुर वर्गाना आर्थिक मदत करून त्यांच्या साठी अन्न, वस्त व निवाऱ्याची सोय केली. या बरोबरच निराधार स्त्रीया व मुली त्यांना आपल्या आश्रमात ठेवुन घेवुन त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली. यात्यांच्या कार्यामुळे दुष्काळी परिस्थितीत देखील हजारो लोकांचे प्राण वाचले.

**स्त्री शिक्षणातील सुधारणा**

स्त्री शिक्षणाचे हे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार स्वतः रमाबाईंनी केला. ज्या वर्षी म्हणजे १८८२ मध्ये आनंदीबाई जोशी पुण्याहून अमेरिकेला रवाना झाल्या, त्याच वर्षी रमाबाई आपल्या मुलीसह वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या. तेथे महाविद्यालयात तरुणांना संस्कृत शिकवून, पैसा खर्च करून शिक्षण व प्रशिक्षण घेतले. एकदा विधवा तरुणांना शिकवत असल्याबद्दल चर्चने आक्षेप घेतला, परंतु मुख्याध्यापकांनी रमाबाईंना पाठिंबा देऊन हा मुद्दा हाताळला.येथूनच आनंदीबाई जोशी यांना दीक्षांत समारंभासाठी पेनसिल्व्हेनिया वुमेन्स मेडिकल स्कूलच्या प्राचार्या रॅचेल एल. बोडले यांनी आमंत्रित केले होते. दरम्यान, रमाबाईंनी अमेरिकेतील विविध शहरांमध्ये भाषणे दिली आणि भारतातील स्त्री शिक्षणाच्या गरजेसाठी आणि तिच्या

कारणासाठी आर्थिक मदत गोळा केली. 1887 मध्ये, 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' स्थापन करण्यात आली, ज्याने रमाबाईंना भारतात महिला शिक्षणासाठी निवासी धर्मनिरपेक्ष शाळा उघडण्यासाठी आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला.

**मुक्ती सदनची स्थापणा**

पंडिता रमाबाईनी समाजकार्यासाठी आपले जीवन खर्ची घातले. लोकांच्या विकासासाठी विशेषता: महिला वर्गाच्या प्रगतीसाठी त्यांनी अनेक संस्थांनची स्थापणा केली. त्याद्वारे महिला वर्गाला शिक्षण देण्याची व्यवस्था केली. या उद्देशाने पुण्याजवळ केडगाव येथे मुक्ती सदन निर्माण केले. या मुक्ती सदनात अनाथ मुली व स्त्रीया यांच्या खाण्या पीण्याची, राहण्याची व शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. अनेक अनाथ स्त्रीयांचा उध्दार घडवुण आनला. या सदनाच्या माध्यमातुन महिला वर्गाला आधार निर्माण करून दिला. त्यामुळेच महिलांना शिक्षण घेवुन स्वविकासाची, प्रगतीची दारे उघडी करून देण्यात आली. अशा प्रकारचे कार्य पंडिता रामाबई यांनी केले.

**समारोप**

पंडिता रमाबाई या खरोखरच एक उल्लेखनीय महिला होत्या ज्यांनी स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतला आणि महिलांच्या हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी बंड केले. पंडिता रमाबाईनी स्त्री शिक्षण , बालविवाह आणि विधवांच्या कल्याणासाठी स्वतःला झोकून दिले . पंडिता रमाबाईंनी पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केली आणि मिशनरी कार्यात सहभागी झाल्या. पंडिता रमाबाईंनी तात्कालिक पुरुष आणि ब्राह्मणवादी समाजातील परंपरा आणि श्रद्धा यांच्यावर युक्तिवाद करण्यास सुरुवात केली आणि स्त्रियांच्या निम्न दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी केवळ महिलांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला नाही तर त्यांनी अध्यापन, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी यांसारख्या क्षेत्रात पुढे येण्याची गरजही व्यक्त केली. पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या आर्य महिला समाजात मुलींचे शिक्षण, बालविवाह रोखणे, विधवांचे कल्याण इत्यादी कार्य केले. पंडिता रमाबाईने आपल्या जीवनता स्त्री उध्दाराला महत्वपुर्ण स्थान दिले. त्या स्वता: एक विद्वान स्त्री होत्या. महाराष्ट्रातील प्रत्येक प्रमाणेच जीवनात यशस्वी वाटचाल करावी असा त्यांचा प्रयत्न असे. स्त्री जीवना विषयी त्यांना जिव्हाळा होता. या कारणास्तव स्त्रीयांच्या विकासासाठी त्यांनी मोठे परिश्रम घेतले. या बरोबरच शेतकऱ्यांच्या, शेतमजरांच्या तसेच गोर गरीब जनतेच्या हितासाठी अशा घटकांना आधार देण्यासाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.

**संदर्भ सुची**

१. अनिल शिंगारे, ओमशिवा लिंगाडे : अधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
२. दिनेश मोरे : अधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास
३. एस. एस. गाठाळ : महाराष्ट्रातील समाज सुधारक विचारधार व कार्य
४. अण्णासाहेब गरड, बि. बी. सावंत : महाराष्ट्रातील समाज सुधारण्याचा इतिहास
५. ग. बा. सरदार : महाराष्ट्राची सामाजिक प्रबोधनाची वाटचाल